महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील बदल्या/पदस्थापना..

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः बदली २०१७/प्र.क्र. २४२/सेवा-२
गो.ते.रुग्णालय इमारत संकुल,१० वा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
तारीख: १८ ऑक्टोबर, २०१७.

वाचा-सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन आदेश क्र. बदली-२०१७/प्र.क्र.१२३/सेवा-२, दि. ५.८.२०१७

शासन आदेश :-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१००+ ग्रेड पे रु. ६६००) मधील जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील डॉ. पी. पी. धारुरकर, सहायक संचालक, आरोग्य सेवा, (वैद्यकीय) कोल्हापूर मडळ कोल्हापूर यांची बदली शासन आदेश दि. ५.८.२०१७ अन्वये जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, सोलापूर येथे करण्यात आली होती. सदर बदली या आदेशाव्दारे रद्द करण्यात येत आहे. तसेच या आदेशानुसार डॉ. सुमेध अंदुरकर, सहायक संचालक (कुष्ठरोग), पुणे यांची बदली जिल्हा शल्यचिकित्सक,सामान्य रुग्णालय, सोलापूर येथे विनंतीनुसार करण्यात येत आहे.

२. सदर आदेश महाराष्ट्र कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४(४) आणि कलम ४(५) च्या तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

३. संबंधित अधिकाऱ्यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे. तसेच त्यांनी रुजू अहवाल संचालक, आरोग्य सेवा,मुंबई तसेच शासनास सादर करावा.

४. सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

५. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१८१६१४२४५११७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2017.10.18 16:47:29 +05'30'

(वि.पुं.घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा.आ.अ., मुंबई
२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (कोल्हापूर, सोलापूर, पुणे)

३) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
४) सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई
५) सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग), पुणे
६) उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर/पुणे
७) जिल्हा शल्य चिकित्सक,सामान्य रुग्णालय,सोलापूर
८) सहायक संचालक, आरोग्य सेवा, (कुष्ठरोग) पुणे
९) सहायक संचालक, आरोग्य सेवा, (वैद्यकीय) कोल्हापूर
१०) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (कोल्हापूर, सोलापूर, पुणे)
११) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर
१२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२ नागपूर
१३) जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर, सोलापूर, पुणे
१४) मा. मंत्री (आरोग्य) / मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
१५) प्रधान सचिव (आरोग्य व कु.क.) यांचे स्वीय सहाय्यक
१६) सर्व संबंधीत अधिकारी, (संचालक,आरोग्य सेवा यांचेमार्फत)
१७) निवडनस्ती (सेवा - २)